**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१९/०५/२०२६

***प्रभाग समिती 'जी' अंतर्गत अनधिकृत बांधकामावर कारवाई***

मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त यांच्या निर्देशानुसार दिनांक १८/०५/२०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत एकूण ३७००० चौ.फुटाचे अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले.

दिनांक १८/०५/२०२६ रोजी प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत ससुनवघर येथे सर्वे नं. १७३ वॉल्टन हॉटेलच्या मागे २१,००० चौ. फूटाचे २ पत्राशेड गोडाउनचे अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या सहाय्याने निष्काशीत करण्यात आले. तसेच चिंचोटी सर्वे नं. ४८ लोहारपाडा येथे ९०० चौ.फूटाच्या ३ रुम, चिंचोटी सर्वे नं. ५६ लोहारपाडा येथे ६०० चौ.फुटाच्या २ रुम व ५२५० चौ.फुटाच्या २१ प्लींथचे अनधिकृत बांधकाम निष्काशीत करण्यात आले. त्याचप्रमाणे चिंचोटी सर्वे नं. ५० व ५१ लोहारपाडा येथे ५५०० चौ.फुटाचे २२ प्लींथचे अनधिकृत बांधकाम व चिंचोटी सर्वे नं. ६९ गवळीपाडा येथे ३७५० चौ. फूटाचे १५ प्लिंथचे अनधिकृत बांधकाम निष्काशीत करण्यात आले.

सदर मोहीमेत एकूण ३७,००० चौ.फुटाचे अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेत आले. या कारवाईवेळी प्रभाग समिती 'जी' वालीव विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री.निलेश म्हात्रे, अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.मनोज घरत, क.अभियंता श्री.मयुरेश पाटील तसेच मजूर कर्मचारी उपस्थित होते.